निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* नांदेड * परभणी * हिंगोली

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २७० * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * दि.०२ फेब्रुवारी २०२६ | * पाने-४

# केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२०२७ सादर; कर प्रणाली जैसे थे

## * अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी रोजगार, शिक्षण आणि युवकांसाठी पेटारा उघडला; अर्थसंकल्पात मोठ्या तरतुदी
## * देशाच्या कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचे वारे; भारत विस्तार एआय टूल सुरू करण्याची अर्थमंत्र्यांची घोषणा

**आत्ताच एक्सप्रेस न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली - केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी १ फेब्रुवारीला म्हणजे आज देशाचा २०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प आज संसदेत सादर केलाय. निर्मला सीतारमण यांनी आज नवव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर केलाय. अर्थमंत्री सीतारमण यांनी राष्ट्रपतींची भेट घेतली आणि त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय कॅबिनेटची बैठक पार पडली. या बैठकीत अर्थसंकल्पाला मंजुरी मिळाली आणि त्यानंतर सकाळी ११ वाजता अर्थमंत्री निर्मला सीतारमण लोकसभेत अर्थसंकल्प सादर केलाय. दरम्यान, भारत जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे आणि पुढील दोन वर्षांत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या तयारीत आहे, अशा वेळी सरकारसमोर अनेक मोठे आर्थिक आव्हाने आहेत.


कापूस आणि वस्त्रोद्योगाचा सर्वांगिण विकासासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीताारामण यांनी पाच कलमी सर्वसमावेशक वस्त्रोद्योग योजना जाहीर केली आहे. त्यात कापड उत्पादन, देशातील कापड उत्पादनांचे जागतिक बाजारात ब्रँडिंग आणि बाजारपेठ विकासित करण्यासाठी मदत केली जाणार आहे.

महात्मा गांधी ग्राम स्वराज उपक्रमाचा प्रस्ताव देण्यात आला आहे. याचा फायदा विणकर आणि कुटीर उद्योगांना होईल. गरीब ग्रामीण तरुणांना याचा फायदा होईल. भारताकडे क्रीडा-संबंधित उत्पादने विकसित करण्याची क्षमता आहे. सोबतच देशात तीन मोठ्या केमिकल पार्कची निर्मिती करणार. हातमाग, वस्त्रोद्योग, हस्तकलेला चालना देण्यासाठी महात्मा गांधी ग्राम स्वराज योजनेची घोषणा यावेळी निर्मला सीताराम यांनी केली आहे.

देशात तीन मोठ्या केमिकल पार्कची निर्मिती करणार. मेगा टेक्स्टाईल उभारणी करणार, देशात तीन बायफॉर्मासाठी १० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. लघु उद्योग, विकासाची नवे शहरे आधारित केंद्र स्थापन करत आहोत. महात्मा गांधी ग्राम स्वराज योजना राबवतोय ज्यातून एक जिल्हा एक उत्पादन आणि ग्रामीण भागातील तरुणांना ट्रेनींग आणि उद्योग देणार आहोत. खेळासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनावर भर देणार आहोत. बायो फार्मातील संशोधन वाढवण्यासाठी ३ नवीन शैक्षणीक संस्था उभ्या करणार. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी रेशीम, ताग आणि लोकरसाठी राष्ट्रीय फायबर योजनेची घोषणा केलीय.

भारताला मेडिकल टुरीझम केंद्र बनवणार, देशात ५ ठिकाणी मेडिकल हब उभारले जाणार, सोबतच भारताला औषध निर्मितीचे हब बनवू, देशात ३ नवीन आयुष आयुर्वैदीक कॉलेज उभे करणार. जामनगरच्या केंद्राला विकसीत करणार. पाच युनिव्हर्सिटी टाऊनशिप उभे करणार, मेडिकल टुरिझम प्रमोट करण्यासाठी देशात ५ हब विकसित करणारप्रत्येक जिल्ह्यात उच्चशिक्षणासाठी मुलींची वसतिगृह उभारणार, मुंबईत एबीजीसीची कंटेट क्रिएटिव्ह लॅब विकसित करणार, डिझाईन क्षेत्राला चालना देणारा, सरकारने एआय मिशन, प्रकल्प हाती घेतले आहेत. सोबतच तरुणांसाठी आरोग्य संस्थेत आम्ही काही तंत्रज्ञानात भर घालणार आहोत. अशी घोषणा निर्मला सीताराम यांनी केली आहे.

खगोलशास्त्राला प्रोत्साहन दिले जाईल. २०,००० तरुणांना पर्यटन मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षित केले जाईल. कंटेंट क्रिएटर लॅबची स्थापना केली जाईल. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी ३ नवीन अखिल भारतीय वैद्यकीय विज्ञान संस्था (एम्स) ची स्थापना करण्याची घोषणा केली आहे. गेल्या १० वर्षात



**काय स्वस्त झालं?** - कॅन्सरची औषधं, मधुमेहाची औषधं, कपडे, चामड्याची बूटं, क्रीडा साहित्य, मोबाईल फोन, ईव्ही बॅटरी, सौर पॅनेल, सीएनजी, वैद्यकीय उपकरणे, एलसीडी, एलईडी, भारतात बनवलेले कपडे, ईव्ही वाहने, मोटारसायकल, फ्रोझन मासे, ईव्ही लिथियम बॅटरी, वैद्यकीय उपकरणे, लिथियम आयन बॅटरी, अपघात विमा,

**काय महाग झालं?** - इंटरॅक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्ले, खनिज, दारु, पीव्हीसी फ्लेक्स शीट्स,

### कर प्रणाली जैसे थे

* ० ते ४ लाख रुपये उत्पन्न- कर नाही
* ४ ते ८ लाख रुपये उत्पन्न- ५ टक्के कर
* ८ ते १२ लाख रुपये उत्पन्न- १० टक्के कर
* १६ ते २० लाख रुपये उत्पन्न- २० टक्के कर
* २० ते २४ लाख रुपये किंवा त्यावरील उत्पन्न- ३० टक्के कर

आम्ही २२ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढले आहे. आमच्या सरकारने सेवा क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतातील तरुणांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी शिक्षणापासून रोजगारापर्यंत उद्योग स्थापन केले पाहिजेत, असा आमचा मानस असल्याचेही त्या म्हणाल्या.

देशाच्या २०२६-२७च्या अर्थसंकल्पात एक प्रमुख घोषणा म्हणजे देशभरातील पाच विद्यापीठ टाउनशिपचा विकास. या टाउनशिपमध्ये शैक्षणिक, संशोधन, वसतिगृहे, क्रीडा आणि स्टार्टअपसाठी एकच सुविधा उपलब्ध असेल. विद्यार्थ्यांना असे वातावरण प्रदान करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे जिथे ते त्यांचा अभ्यास करत असताना नवीन कल्पना आणि नवोपक्रमांवर काम करू शकतील. याव्यतिरिक्त, देशभरात पाच नवीन विद्यापीठे उघडण्याची घोषणा करण्यात आली आहे. यामुळे उच्च शिक्षणाची सुविधा सुलभ होईल आणि वेगवेगळ्या राज्यांमध्ये शिक्षणाच्या नवीन संधी उपलब्ध होतील.

खेलो इंडिया मिशन स्थापन केले जाईल. पुढील १० वर्षांत या उपक्रमांतर्गत काम केले जाईल. या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली जातील. प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांना पद्धतशीरपणे प्रशिक्षित केले जाईल. स्पर्धा आणि लीग आयोजित केल्या जातील. प्रशिक्षण आणि स्पर्धेसाठी क्रीडा पायाभूत सुविधा विकसित केल्या जातील. अशी घोषणा निर्मला सीताराम यांनी केली आहे.

करांद्वारे २८ लाख कोटींचा महसूल मिळेल हे निर्मला सीतारमण यांनी जाहीर केलं. तर चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट ४.४ टक्के असून पुढच्या आर्थिक वर्षात ही तूट ४.३ टक्के राहिल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान भारतातील काजू आणि कोकोला जागतिक ब्रँड बनवणार असल्याचंही निर्मला सीतारमण यांनी जाहीर केलं आहे. क्लाऊड सर्व्हिसेस देणाऱ्या परदेशी कंपन्यांना २०४७ पर्यंत करमुक्ती दिली जाईल ही घोषणाही करण्यात आली.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये मोठा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, ७ हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली. याचा फायदा मुंबई, पुणे, हैदराबाद, बंगळुरू, चैन्नई, दिल्ली,वाराणसी आणि सिलिगुडी या प्रमुख शहरांना होणार आहे.

निर्मला सीतारमण म्हणाल्या, ''पर्यावरणदृष्ट्या शाश्वत प्रवासी व्यवस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी, आम्ही शहरांमध्ये विकास जोडणारे सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर विकसित करू. मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद, हैदराबाद ते बेंगळुरू, हैदराबाद ते चेन्नई, चेन्नई ते बेंगळुरू, दिल्ली ते वाराणसी आणि वाराणसी ते सिलीगुडी या शहरांमध्ये स्पीड रेल्वे कॉरिडोर विकसित करणार आहोत.''

अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी रविवारी (ता.१) संसदेत देशाचा २०२६-२७ आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात वस्त्रोद्योगाच्या सर्वांगिण विकासासाठी पाच कलमी कार्यक्रम जाहीर केला. पहिले कलम- राष्ट्रीय कापड योजना, रेशीम उद्योग, लोकर उद्योग, ताग उद्योग तसेच कृत्रिम कापड उद्योगासाठीच्या योजनांचा समावेश आहे. या योजनेतून कापड निर्मितीला प्रोत्साहन देण्यात येणार (पान ४ वर)

### बजेटमधील मोठ्या घोषणा

* १ एप्रिलपासून नवा आयकर कायदा लागू
* टॅक्स स्लॅब जैसे थे, आयकरात बदल नाही
* ३१ जुलैपर्यंत आयकर रिटर्न दाखल करता येणार
* अपघात विमा करमुक्त असेल
* सेमी कंडक्टरसाठी ४० हजार कोटी
* शुगर आणि कॅन्सरचे औषधोपचार स्वस्त
* मुंबई- पुणे आणि पुणे-हैदराबाद नवे रेल्वे कॉरिडॉर
* २० नवे जलमार्ग बनवणार
* बॅंकिंग क्षेत्राच्या विकासासाठी नवी समिती
* भारताला मेडिकल टुरीझम केंद्र बनवणार
* प्रत्येक जिल्ह्यात उच्चशिक्षणासाठी मुलींची वसतिगृह उभारणार
* २० प्रमुख पर्यटन स्थळांवर १०,००० पर्यटन मार्गदर्शक- टूर गाईड्स
* गेमिंग आणि कंटेंट क्षेत्रांच्या वाढीवर भर दिला जाईल
* २०३० पर्यंत २० लाख व्यावसायिक निर्माण केले जातील
* परदेशी नागरिक भारतीय शेअर खरेदी करणार
* चंदन, नारळ आणि काजू या पिकांना चालना देणार

### आरोग्य क्षेत्राला काय?

* भारताला मेडिकल टुरीझम केंद्र बनवणार
* देशात ५ ठिकाणी मेडिकल हब
* भारताला औषध निर्मितीचे हब बनवू,
* बायोफार्मासाठी १०,००० कोटींची तरतूद
* शुगर आणि कॅन्सरचे औषधोपचार स्वस्त
* देशात ३ नवीन आयुष आयुर्वैदीक कॉलेज उभे करणार.
* जामनगरच्या केंद्राला विकसीत करणार.
* पाच युनिव्हर्सिटी टाऊनशिप उभे करणार
* मेडिकल टुरिझम प्रमोट करण्यासाठी देशात ५ हब विकसित करणार

### शिक्षण क्षेत्राला काय?

* प्रत्येक जिल्ह्यात उच्चशिक्षणासाठी मुलींची वसतिगृह उभारणार
* मुंबईत एबीजीसीची कंटेट क्रिएटिव्ह लॅब
* पशुवैद्यकीय आणि हॉस्पिटलसाठी अर्थसहाय्य
* डिझाईन क्षेत्राला चालना

### शेतकऱ्यांसाठी काय?

* नारळ संशोधन केंद्र स्थापन करणार-३ कोटी शेतकऱ्यांना लाभ
* पशूपालन दुग्धव्यवसायासाठीचे अनुदान वाढवणार
* काजू, कोको ब्रँड जागतिक दर्जा मिळवून देणार
* शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न
* ५०० एकात्मिक मत्स्य केंद्र उभारणार
* दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन अधिक मजबूत करणार
* चंदन, नारळ आणि काजू या पिकांना चालना देणार
* ईशान्य भारतात बदाम आणि शेंगदाण्याचे उत्पादन वाढवण्यावर सरकारचा भर
* चंदन लागवडीला प्रोत्साहन देण्यात येईल.
* आयातीवर अवलंबत्व कमी करणार
* मत्स्यवसायात महिलांचा सहभाग वाढवणार
* सागरी किनारपट्टी आणि इशान्येकडील शेतकऱ्यांना मदत करणार
* शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी नवे पर्याय तपासणार

## अर्थसंकल्पामुळे सुधारणांना नवीन गती मिळेल; कौशल्य, व्याप्ती आणि शाश्वतता मजबूत होईल-पंतप्रधान मोदी



पंतप्रधान मोदींनी रविवारी अर्थसंकल्पावर बोलताना सांगितले की, देशात सुधारणा एक्सप्रेस धावू लागली आहे. जे बदल करण्यात आले आहेत, ते अभिव्यक्तीने भरलेल्या भारताच्या धाडसी आणि प्रतिभावान तरुणांना मोकळे आकाश देतात. ते म्हणाले की, अर्थसंकल्पामुळे सुधारणांना नवी गती मिळेल. हा कौशल्य, प्रमाण आणि शाश्वतता (टिकाऊपणा) मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. सर्वात मोठे भांडवल म्हणजे नागरिक, यातच गुंतवणूक केली. पंतप्रधानांनी सांगितले की, हा एक असा अनोखा अर्थसंकल्प आहे, ज्यात वित्तीय तूट कमी करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यासोबतच अर्थसंकल्पात उच्च भांडवली खर्च (कॅपॅक्स) आणि उच्च वाढीचा समन्वय आहे. हे देशाच्या जागतिक भूमिकेला नव्याने बळकट करते.

आम्ही वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनूनच समाधानी नाही. तर लवकरच तिसरी अर्थव्यवस्था बनू इच्छितो. हे बजेट अफाट संधींचा महामार्ग आहे. हे बजेट वर्तमानातील स्वप्नांना साकार करते. भारत ज्या सुधारणांवर स्वार आहे, बजेटमुळे त्याला नवी गती मिळेल. सोबत जो करार झाला आहे, त्याचा फायदा भारतातील तरुणांना मिळावा यासाठी बजेटमध्ये मोठी पाऊले उचलण्यात आली आहेत. या बजेटमध्ये नव्या गतीसाठी महत्त्वाकांक्षी रोडमॅप तयार करण्यात आला आहे. सनराईज क्षेत्राला ज्या मजबूतपणे महत्त्व दिले आहे ते महत्त्वाचे आहे. रेअर अर्थ कॉरिडॉर, क्रिटिकल मिनरल्सवर भर, टेक्स्टाईल, हायटेक टूल मॅन्युफॅक्चरिंग यांसारख्या गोष्टी भविष्य आणि वर्तमानातील गरजांची काळजी घेतात. अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा (इन्फ्रा) मजबूत करण्यासाठी अनेक मोठी पाऊले उचलण्यात आली आहेत. हाय स्पीड रेल्वे कॉरिडॉर, टियर टू आणि थ्री शहरांच्या विकासावर लक्ष केंद्रित करणे, ही सर्व पाऊले विकसित भारताच्या प्रवासाची गती आणखी वाढवतील. कोणत्याही देशाची सर्वात मोठी संपत्ती नागरिक आहेत. आम्ही यावर गुंतवणूक केली आहे. आमचा प्रयत्न कौशल्य (स्किल), प्रमाण (स्केल) आणि शाश्वतता (सस्टेनिबिलिटी) मजबूत करण्यावर राहिला आहे.

## तरुण, महिला आणि शेतकऱ्यांच्या स्वप्नांना शक्ती देणारा अर्थसंकल्प-अमित शाह



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज (रविवार) सलग नवव्यांदा देशाचा पूर्णकालिक अर्थसंकल्प सादर करत एक नवा इतिहास रचला. या अर्थसंकल्पावर विविध स्थरांतून प्रतिक्रिया येत आहेत. यातच, ''हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक आणि दूरदृष्टी असलेला आहे. विशेष म्हणजे, या अर्थसंकल्पात तरुण, महिला आणि शेतकरी या तीन घटकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.'' असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले आहे. निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर, अमित शाह यांनी एक्सवर आपली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, ''या अर्थसंकल्पात मॅन्युफॅक्चरिंगपासून इन्फ्रास्ट्रक्चरपर्यंत आणि आरोग्यापासून पर्यटनापर्यंत, ग्रामिण भागापासून आर्टिफिशियल इंटेलिजन्स पर्यंत आणि खेळांपासून ते धार्मिक स्थळांपर्यंत, हा अर्थसंकल्प प्रत्येक गाव आणि प्रत्येक शहरातील तरुण, महिला आणि शेतकऱ्यांच्या स्वप्नांना शक्ती देऊन ते पूर्ण करणारा आहे.'' अमित शहा म्हणाले, हा अर्थसंकल्प भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याच्या उद्दिष्ट तयार करण्यात आला आहे. जो पुढील २५ वर्षांसाठी एक स्पष्ट रोडमॅप दर्शवतो. अमित शाह यांनी या ऐतिहासिक अर्थसंकल्पासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे अभिनंदन केले.

## केंद्रीय अर्थसंकल्प : महाराष्ट्राला मिळणार सुमारे १ लाख कोटी! विकसित भारताकडे दमदार पाऊल -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताकडे दमदार वाटचाल करणारा आहे. केंद्रीय करातून महाराष्ट्राला मिळणारा वाटा हा ९८,३०६ कोटी रुपये इतका असणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पाचे प्राथमिक आकलन करता, १२,३५५ कोटी विविध प्रकल्पांसाठी आहेत. त्यामुळे सुमारे १ लाख कोटी महाराष्ट्राला मिळतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक सरकार करणार आहे, पूर्वी जी केवळ १ लाख कोटी असायची. ५ लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील विकासाचा विचार करुन शहरीकरणाच्या एकात्मिक विचार करण्यात आला आहे. यातून विविध क्षेत्रांना दिशा, गती आणि निधी प्राप्त होणार आहे. याचा मोठा लाभ महाराष्ट्राला होणार आहे. शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. पुणे-हैदराबाद कॉरिडॉरचा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राला मोठा लाभ होईल. ग्रोथहबसाठी ५००० कोटी प्रत्येकी ५ वर्षांत प्राप्त होणार आहेत, याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबला होणार आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## राज्यातील लहान शहरांच्या विकासाला वेग; मुंबई, महाराष्ट्राला अधिक शक्ती देणारा अर्थसंकल्प-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे




एकीकडे लहान लहान शहरांच्या सर्वांगीण विकासाला चालना देतांना, पायाभूत सुविधा वाढविण्याच्या त्याचप्रमाणे सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देण्याच्या घोषणांमुळे देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या मुंबई आणि महाराष्ट्राला मोठे बळ मिळेल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील विकसित भारताच्या दिशेनं निर्धारपूर्वक पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प आहे. आत्मनिर्भर विकसित भारताकडे झेप घेणारा हा नववा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे हार्दिक अभिनंदन या शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. उपमुख्यमंत्री म्हणतात की, जगातील अनेक देशांची अर्थव्यवस्था कोलमडली असताना भारताने आपला विकास दर कायम ठेवला आहे. आर्थिक विकास, सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचावणे आणि 'सबका साथ सबका विकास' या तीन कर्तव्यांभोवती हा अर्थसंकल्प बांधण्यात आलेला आहे. त्यात वर्तमानाचे भान आहे आणि भविष्याची जाण आहे. आजच्या केंद्रीय अर्थसंकल्पामुळे मुंबई आणि महाराष्ट्राला मोठा फायदा होणार आहे असे सांगून उपमुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या वर्षी मुंबईत मनोरंजन आणि करमणूक उद्योगाशी संबंधित जागतिक दर्जाची वेव्हज परिषद झाली होती. मुंबई हे या उद्योगाचे बलस्थान आहे हे ओळखून याठिकाणी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी उभारण्याची केलेली घोषणा महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून टियर टू आणि टियर थ्री शहरांच्या क्षमतांचा विचार करून त्यांच्या सर्वांगीण विकासाला वेग देण्याची केलेली घोषणा ही या शहरांचे आर्थिक बळ वाढवणारी ठरेल. पाच लाखापेक्षा जास्त लोकसंख्येच्या शहरांमध्ये पायाभूत सुविधा वाढविणे आणि पायाभूत सुविधा फंडाची स्थापना करून बारा लाख कोटी निधी शहर विकासासाठी ठेवणे यामुळे शहरांचे रूप बदलून जाईल असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महापालिकांच्या बाँड्ससाठी प्रत्येकी १०० कोटी सवलतीच्या रूपात देण्याची केलेली गोष्टदेखील राज्यातल्या महानगरपालिकांना बळकट करणारी आहे. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर मॅन्युफॅक्चरिंग उद्योगदेखील आहे आणि आज केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी ज्या योजना जाहीर केल्या त्याचादेखील फायदा महाराष्ट्रातल्या लहान मोठ्या निर्मिती उद्योगांच्या वाढीसाठी होणार आहे. सेमी कंडक्टर क्षेत्रासाठी चाळीस हजार कोटींची तरतूद, बायोफार्मा क्षेत्रासाठी दहा हजार कोटी तरतूद, वस्त्रोद्योग क्षेत्रात प्रगत तंत्रज्ञान आणून वस्त्रोद्योग, हातमाग आणि हस्तकला उद्योगाला प्रोत्साहन देणे, कंटेनर उत्पादनासाठी योजना, डेटा सेंटर साठी सवलती या सगळ्या घोषणांचा फायदा हे उद्योग मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात असल्यामुळे महाराष्ट्राला निश्चितच होईल.

# राजकारणातील दुर्मीळ माणूस

अजित पवार यांच्या विरोधात लिहिले, बोलले तरी वैयक्तिक मैत्र कधी दुरावणार नाही, याची खात्री होती. राजकारणात अशी माणसे दुर्मीळ होत आहेत बुधवारी (२८ जानेवारी) सकाळी छत्रपती संभाजीनगरच्या वाटेवर असतानाच, अजित पवारांच्या विमानाला अपघात झाला असून, त्यामध्ये बहुधा त्यांचे निधन झाले आहे, असे सांगणारा फोन आला आणि खऱ्या अर्थाने धक्का बसला. पत्रकारांच्या वाट्याला वाईट घटना पहिल्यांदा कळण्याचा एक योग असतो. पूर्वीच्या औरंगाबादच्या आणि आत्ताच्या संभाजीनगरच्या वाटेवर असताना माझ्या नशिबात वाईट बातमी ऐकण्याचा आलेला हा तिसरा योग. सगळ्यात पहिल्यांदा विलासराव देशमुख, त्यानंतर गोपीनाथ मुंडे आणि आता अजित पवार. या प्रवासाची भीती वाटू लागावी असा हा विचित्र योगायोग. त्यानंतरचा अर्धा तास वेगवेगळ्या ठिकाणी फोन करून ही बातमी खोटी ठरावी यासाठी धडपड करून झाली, पण अशा बातम्या खोट्या ठरत नाहीत हाच अनुभव पुन्हा एकदा आला. गाडी परतीच्या वाटेवर फिरवायला सांगितली आणि डोळ्यासमोर उलगडू लागला तो त्यांच्यासोबतच्या स्नेहाच्या अनेक वर्षांच्या आठवणींचा पट अजित पवार संसदीय राजकारणात आले त्याला पस्तीस वर्षे होऊन गेली. त्याच दरम्यान ते पुणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्षही झाले होते. त्या वेळेस त्यांची प्रतिमा 'शरद पवार यांचा पुतण्या' इतकीच होती. जिल्हा बँकेच्या संचालक मंडळात पवारांबरोबर काम केलेली सगळी सीनियर मंडळी होती. पण आपल्या शिस्तीने त्यांनी त्या संचालक मंडळाला रेषेत आणले आणि आपली वेगळी प्रतिमा तयार करण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. त्यानंतर लोकसभा, विधानसभा, राज्यमंत्री, पुन्हा आमदार, मग कॅबिनेट मंत्री असा प्रवास झाला. या प्रवासात साधारण १९९९पासून २०१४पर्यंत ते पुण्याचे पालकमंत्री होते. सुरुवातीपासून त्यांनी पुण्यापेक्षा पिंपरी-चिंचवडमध्ये जास्त लक्ष घातले. पिंपरी चिंचवडमध्ये तेव्हा प्रा. रामकृष्ण मोरे यांचे वर्चस्व होते. मोरे हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते; पण तेथेही मोरे सरांच्या नेतृत्वाला आव्हान देताना अजित पवारांनी आपला स्वतंत्र गट तयार केला. १९९७च्या महापालिका निवडणुकीनंतर पिंपरी चिंचवड महापालिकेतील कोणतेही पद अजित पवारांच्या होकाराशिवाय ठरविणे मुश्कील झाले, इतकी ती ताकद होती. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेपाठोपाठ पुणे जिल्हा परिषदेवरही त्यांनी वर्चस्व प्रस्थापित केले होते. याच काळात शरद पवार यांनी दिल्ली ही आपली कर्मभूमी ठरविली आणि राज्यातील त्यांच्या राजकारणाचा वारस म्हणून अजित पवार यांनी १९९९मध्ये मंत्रिपद मिळविले. विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळात जलसंपदामंत्री झालेल्या अजित पवारांनी मग मागे वळून बघितलेच नाही. शिवसेना-भाजप युती सरकारच्या काळात सुरू झालेले कृष्णा खोरे योजनेचे काम त्यांनी धडाक्याने पुढे नेले. त्यासाठी त्यांच्यावर टीकाही झाली. ठरावीक कंत्राटदारांवर दादा मेहेरनजर करतात, अशा बातम्याही प्रसिद्ध झाल्या. (पुढे त्यांच्यावर सत्तर हजार कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराचे आरोप झाले त्याची मूहूर्तमेढ याच कारकिर्दीमध्ये रोवली गेली होती.) या विभागामुळे पुण्यापलीकडे सातारा, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये विस्तार करण्यास त्यांना संधी मिळाली व त्यांनी त्याचा पुरेपूर वापर केला. सोलापूरमध्ये विजयसिंह मोहिते पाटील यांच्या, तर सातारा जिल्ह्यातील उदयनराजे भोसले यांच्या राजकारणाला शह देताना अजित पवार २००४ पर्यंत 'राष्ट्रवादी'चे प्रमुख नेते बनले होते. खासदार सुरेश कलमाडी यांच्या एकछत्री अमलाखाली असलेल्या पुणे महानगरपालिकेत २००७मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेसपेक्षा अधिक जागा मिळवितानाच पुणे जिल्ह्याचे निर्विवाद नेते म्हणून अजित पवार यांनी स्वतःचे स्थान बळकट केले. राज्याच्या राजकारणात ते वेगाने पुढे जात राहिले. या दरम्यान सुप्रिया सुळे राजकारणात सक्रिय झाल्याने शरद पवार यांचा राजकीय वारस कोण, असे प्रश्न माध्यमातून उपस्थित केले गेले. त्याला त्यांनी कधीही थेट उत्तर देण्याचा प्रयत्न केला नाही; पण राज्यात तरी आपल्याखेरीज पर्याय नाही, हे ते कृतीमधून सांगत राहिले. अजित पवारांचा पुण्याशी व पुण्यातील बातमीदारांशी खऱ्या अर्थाने संबंध आला तो याच काळात. सन १९९९नंतर पालकमंत्री म्हणून काम करायला लागल्यावर त्यांच्यावर अनेकदा पुण्यामध्ये टीका झाली. महापालिकेत ते लक्ष देऊ लागल्यावर ती धारदार झाली. त्या टीकाकारांमध्ये अनेकदा मी आघाडी घेतली होती. अर्थात टीका मुद्द्यांवर आणि कार्यपद्धतीवर असायची. अजित पवार यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी ही टीका कधीच वैयक्तिक पद्धतीने घेतली नाही. बातमी प्रसिद्ध झाल्यावर थेट फोन करून ते आपली बाजू मांडायचे. 'ही बाजू जाहीरपणे का मांडत नाही,' असे विचारल्यावर 'मला काय तेवढाच उद्योग आहे का' असे म्हणायचे. पण लोकहिताची एखादी सूचना पटल्यास अमलातही आणायचे. अजित पवार यांच्या भेटीची वेळ सकाळी साडेसहाची. त्याआधी आपण जाऊन धडकले की भेट व्हायची. अजित पवारांना एखाद्या विषयाची माहिती देण्यासाठी कधीही कागद हातात धरावा लागला नाही. स्वच्छता व टापटीप याच्याबद्दल कमालीचे जागरूक असायचे. एकदा रात्री साडेबारा वाजता त्यांच्या बारामतीच्या निवासस्थानावरून निघताना मधल्या पॅसेजच्या कोपऱ्यातील ओल बघितल्यावर संबंधितांना तातडीने फोन करून झापणारे अजित पवारही मी स्वतः बघितले आहेत. एखादी गोष्ट आवडली तर ती बघून त्याची माहिती घेण्यासाठी ते धडपडायचे. माझ्या एका मित्राने खडकवासला परिसरात फार्म हाऊसमध्ये कृत्रिम धबधबा तयार केला होता. त्यासाठी फायबरचे खडक तयार करून घेतले होते. ते कळल्यानंतर अजित पवार यांनी थेट त्या मित्राला फोन करून, 'उद्या सकाळी आठ वाजता येतो' असा निरोप दिला. आल्यावर, बारकाईने सगळी चौकशी केली. एका तरुण पत्रकाराचे अपघाती निधन झाल्यानंतर आम्ही काही जण मदत गोळा करीत होतो. त्याही वेळेस निरोप पाठवून हस्ते परहस्ते मदत करताना दादांनी त्यांच्यातील माणूसपणाचे घडविलेले दर्शन कधीच न विसरता येणारे. लौकिक अर्थाने अशा मदतीतून काहीही मिळणार नसतानाही ती करण्याची त्यांची वृत्ती अनेक तथाकथित मोठ्यांच्या ठायीही दिसत नाही. कबड्डी, खोखोच्या संघटनांना, खेळाडूंना त्यांनी आर्थिक स्थैर्य मिळवून दिले. त्यातील विजेत्यांना सरकारकडून भरघोस बक्षीसेही जाहीर केली. ऑलिम्पिक पदकविजेत्यांना मिळणाऱ्या रकमेपेक्षा ही रक्कम अधिक असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर ऑलिम्पिक विजेत्यांच्या बक्षिसांची रक्कम वाढविणारे अजितदादा देशी खेळांवर मनापासून प्रेम करणारे.

# वाहणाऱ्या नद्या, हरणारी माणसे !



नद्या सतत वाहत असतात. वाहणे हा त्यांचा धर्म. अनेक नद्या समुद्राला मिळतात. वाफ होऊन आकाशात जातात आणि पावसाच्या रूपाने खाली येतात. चराचराला संजीवनी देणे, आतबाहेर ओल-हिरवाई जिवंत ठेवणे हे त्यांचे काम! मासे, मगरी, कासवे-पाणमांजरे, शंख-शिंपले, ज्ञात-अज्ञात कीटक, जलचर, शेवाळं, पाणवनस्पती यांचे संसारही नद्यांना फुलवायचे असतात. काठावर गाळ पेरत वांगी, मिरच्या, कलिंगडे पिकवायची असतात. वृक्षवेलींना, पक्ष्यांना, गाईगुरांना-वनचरांना पाणी द्यायचे असते. नावाड्यांची गाणी, आदिम जमातींची लोकगीते ऐकायची असतात. आकाशाच्या प्रकाशित तुकड्यांना आरसा दाखवायचा असतो.

बहुसंख्य नद्या आज धरणांनी अडवल्या गेल्या आहेत. पण आतील पाझर ओले ठेवत तसूतसुने पुढे सरकत भूगर्भ ओला ठेवण्याचे त्यांचे काम अखंड सुरू असते. काही नद्या वाटेतच सुकून जातात. पण जेथे थांबतात तेथे त्यांच्या काळजाशी काही ओल टिकून असते. ती ओल धरून चिवट मासे, कासवे, शंख-शिंपले, बेडूक, चिंबोऱ्या, ज्ञात-अज्ञात जलचर आपला जीव आकसून घेत नव्या हंगामाची प्रतीक्षा करीत राहतात. नदीवर प्रेम करणाऱ्या माणसांना त्यांच्या या सुषुप्त अस्तित्वाची जाणीव असते. ती त्यावर लेखन-वाचन, चिंतन-मनन करतात. कथा-कविता लिहितात. चित्रे काढतात. चित्रपट-माहितीपट काढतात. मृतप्राय होऊ घातलेल्या नदीला जणू सोबत देतात. तिचे सांत्वन करतात. तिचा आक्रोश जगापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतात. पुन्हा निसर्गचक्र फिरले, पाऊस आला, पाणी नाचू लागले की अशा नद्या जाग्या होतात. आत जीव धरून असलेले जलचर आपल्या अंथरुणाची वळकटी गुंडाळत उठतात आणि पुढच्या प्रवासाला लागतात!

मी भारतातील अनेक नद्या पाहिल्या आहेत. त्यांच्या काठी वस्तीस राहिलो आहे. त्यांचे पाणी प्यायलो आहे. संगमांवर रेंगाळलो आहे, त्यांच्यातून मनसोक्त विहार केला आहे. अनेक नद्यांचे उगम, संगम, त्रिभूज प्रदेश पाहिले आहेत. श्रीनगरजवळ वेरीनाग येथून उगम पावणारी झेलम, लडाखमधून भारतात प्रवेशणारी सिंधू, तिची उपनदी शोक, दक्षिणेतील पेरियार-कालडी, गोव्यातील मांडवी, मध्य प्रदेश-गुजरात-महाराष्ट्रातून पूर्व-पश्चिम वाहणारी नर्मदा यांसारख्या अनेक नद्या जवळून पाहिल्या आहेत. रावी, चिनाब, झेलम, सतलज, गंगा-यमुना पुनःपुन्हा पाहिल्या आहेत. आसामातील ब्रह्मपुत्रा या देशातील सर्वांत मोठ्या नदीतून विहार केला आहे. जगातील सर्वांत सुंदर मानली जाणारी मेघालयातील डावकी पहिली आहे. तिचा स्वच्छ तळ आणि काठाला असणाऱ्या प्राचीन पाषाणखंडांच्या बाजूबाजूने प्रवास केला आहे! मेळघाटातील कोकटू नदीचा आदिम-अस्पर्श परिसर डोळे भरून पाहिला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड येथील पर्लकोटा नदीकाठी, मेळघाटातील कोलखास येथील सिपनाकाठी भटकंती केली आहे. मुक्कामी राहिलो आहे. जिच्या काठी कालिदासाची आवडती उज्जैन नगरी वसली ती सुंदर क्षिप्रा जवळून पाहिली आहे. (सुमारे दोनशे किलोमीटर लांबीची क्षिप्रा माळव्याची गंगा म्हणूनही ओळखली जाते. तिच्या काठी कुंभमेळा भरतो. ती सदैव वाहती राहावी म्हणून नर्मदेचे पाणी तिच्यात सोडले जाते.)

कर्नाटकातील थलकावेरी येथून उगम पावणारी कावेरी, भीमाशंकर येथून निघणारी भीमा, ब्रह्मगिरीवरून निघणारी गोदावरी, अशा अनेक नद्यांचे उगम मी अनावर कुतूहलाने पाहिले आहेत. महाबळेश्वर येथून निघणाऱ्या कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री, सावित्री यांच्या उगमस्थानी गेलो आहे. ऊन-पाऊस-थंडी अशा सर्व ऋतूंत त्या नद्या जवळून पाहिल्या आहेत. कराडला कृष्णा-कोयनेच्या संगमावर चिंब भिजलो आहे. तापोळा येथील कृष्णा, कोयना आणि सोळशी यांचा त्रिवेणी संगम डोळे भरून पाहिला आहे. त्या संगमावर जलविहार केला आहे. भिगवण येथे भीमेच्या बॅक वॉटरमध्ये मनसोक्त भ्रमंती केली आहे. मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर येथे नर्मदेत तृप्त फिरून आलो आहे. तेथील ओंकार पर्वताला होडीतून प्रदक्षिणा करत नर्मदा आणि कुवेरी नदीच्या संगमावरील आल्हादायक हवा आणि तो अद्भुत निसर्ग तनमनात भरून घेतला आहे. पुढे माहेश्वर येथे नर्मदेच्या काठी बसून नर्मदेचा अथांग प्रपंच डोळे भरून पाहिला आहे. त्यानेच अहिल्याबाई होळकर यांना पराक्रमाची विशाल स्वप्ने दाखवली असेल आणि ती कृतीत उतरवण्याची प्रेरणा दिली असेल हे मनोमन समजून घेतले आहे.

हिमाचलमध्ये चंबा खोऱ्यात रावी आणि सेहुल या नद्यांच्या संगमावर मी बोटीने फिरलो आहे. तेथील स्वच्छ निळे पाणी आणि बाजूच्या उंच हिरव्या डोंगरांगांचा सहवास अनुभवला आहे. रावी आणि सेहुलच्या संगमावरील विशाल पाणपसारा बघून, देहभान हरपून बसलो आहे. त्यात तरंगणाऱ्या सूचीपर्णी वृक्षांच्या ओंडक्यांनी प्राचीनकाळी लाकूड कसे वाहून नेले जात असेल याची चित्रमय झलक दाखवली आहे. मेघालयात डावकीतून फिरताना समुद्रसपाटीवरचा दगड-गोट्यांचा भूभाग तर दुसरीकडे हिमालयातील पर्वतरांगांच्या मधून वाहणाऱ्या उंचावरच्या प्रदेशातील छाती दडपून टाकणारा थरार अशी दोन्ही टोके अनुभवली आहेत. कावेरी, नर्मदा, गोदावरी, तापी अशा नद्या मी पुनःपुन्हा जवळून पाहिल्या आहेत. उजनी आणि कोयनेच्या विशाल जल-सान्निध्यात रमलो आहे. नद्यांचे उगम कोरडे कसे पडतात हेही पाहिले आहे. भीमाशंकराच्या देवळामागून होणारा भीमेचा उगम हे त्याचे एक उदाहरण! कर्नाटकात सोमेश्वर बीचवर बैंदूर नदी आणि अरबी समुद्राचा संगम पाहिला आहे. कन्याकुमारी येथे तीन, तर धनुषकोडी येथे दोन महासागरांचा संगम पाहिला आहे. या आणि अशा प्रवासात जागोजागी त्यांना भेटणाऱ्या असंख्य नद्याचे चुटपुटते दर्शन घेतले आहे.

उत्तराखंडमध्ये भागीरथी आणि अलकनंदेच्या मीलनातून गंगेचा उगम कसा होतो आणि तेथील लाल आणि हिरव्या रंगाचे पाणी एकमेकांना मिठीत कसे घेते ते पाहिले आहे. लडाखमध्ये बास्पा आणि झंस्कार या नद्यांचा रोमहर्षक संगम पाहिला आहे. लेहजवळ झंस्कार नदीच्या काठी 'वजा तीस अंश सेल्सिअस' तापमानात दोन रात्री तंबूमध्ये मुक्काम केला आहे. सिक्कीममधील अशाच थंडीत युमथांग व्हॅलीत झिरो पॉइंट येथे तिस्तेच्या धारेत हात घालून हाडापर्यंत शिरणाऱ्या थंडीचा थरार अनुभवला आहे. हिमालयात 'एव्हरेस्ट बेस कॅम्प'ला जाताना पहिले दोन दिवस नेपाळमधील दूधकोशी नदीच्या सान्निध्यात राहण्याचे भाग्य मला मिळाले आहे. हिमालयात बागिनी ग्लेशियरवर गिर्यारोहण करताना धौलीगंगेच्या काठी तंबूत मुक्काम ठोकला आहे. हिमनद्यांचा घोष कसा असतो, त्यांचा जन्म कसा होतो हे सतरा हजार फूट उंचीवर, हाडे गोठवणाऱ्या थंडीत जवळून जाणून घेतले आहे. माझ्या गावचीरायगड जिल्ह्यातील पोलादपूरची सावित्री तर माझ्यातून कायम सळसळत असते. माझ्यातील चैतन्य जागे ठेवत असते! महाराष्ट्रातील इतर नद्यांच्या तुलनेत जलदगतीने वाहत समुद्राला मिळणारी, एकशे दहा किलोमीटर लांबीची ही लहानात लहान पश्चिमवाहिनी नदी! तिचे माहात्म्य आणि पुराणातील तिचा 'क्रांतिकारी स्वभाव' लक्षात घेता ती चांगली नावारूपाला यायला हवी होती. तिची परिक्रमासुद्धा लोकप्रिय ठरू शकली असती. पण ते बाजूला राहिले, उलट तिच्यावर इतके अत्याचार होत राहिले की तेवढे देशातील कोणत्याही नदीवर झाले नसतील! आजही तिच्यातून होणारा वाळूचा उपसा, तिच्यात सोडले जाणारे सांडपाणी, विषारी पाणी तिची विटंबना करीत असते. महाडजवळ जेथे सावित्री खाडीला मिळते. त्या भागातील तिचे रक्तासारखे लाल, मृतप्राय पाणी पाहताना जीव गलबलून येतो. (अलीकडे सगळ्याच नद्यांची कर्मकहाणी थोड्या फार फरकाने अशीच आहे)

मी जेव्हा जेव्हा पोलादपूरला जातो आणि सावित्रीच्या काठावर बसून तिच्या पाण्यात हात घालतो तेव्हा तेव्हा तेथील मासे धावत येतात आणि माझ्याशी जणू हस्तांदोलन करू लागतात. क्षणभर अविश्‍वसनीय वाटणारा हा अनुभव मला नेहमी रोमांचित करून टाकतो. किनारे फुलवत-फळवत मधल्या धारेने झुळझुळत राहणे हा नद्यांचा धर्म! दुःख, समस्या, अडचणी किनाऱ्यावर फेकून देत आपणही निर्मळपणे वाहत राहिले पाहिजे; अशी प्रेरणा त्या माणसाला देत असतात. कधीतरी लक्षात येते की, वाहत जाणे सोपे पण प्रवाहाच्या विरोधात पोहणे अवघड! जगण्याची खरी कसोटी लागते ती प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्यात. मासे आयुष्यभर तोच नाद करत असतात पण हे माणसाच्या लक्षात येत नाही तो कष्टाची दिशा टाळून उताराच्या दिशेने वाहत जाण्यात धन्यता मानतो!

गर्दीत माणूस हिंसक होतो असे जे. कृष्णमूर्ती यांनी म्हटले आहे. नद्याही नागरी परिसरात शिरल्या की अस्वस्थ होतात, संतापतात. मोठमोठी शहरे आणि पुण्यक्षेत्री त्यांची सर्वाधिक विटंबना होताना दिसते. त्यांचा मार्ग बदलून त्यांच्यावर होणाऱ्या अतिक्रमणाचा राग त्या कधीतरी बाहेर उपसून काढतात. आपले जुने मार्ग बरोबर शोधून काढतात. हाहाकार उडतो पण माणूस शहाणा होत नाही. नद्यांवर केवळ कथा, कविता, कादंबऱ्या लिहीत बसण्यापेक्षा त्यांच्या दुर्दशेच्या विरोधात उभे राहणे ही काळाची गरज ठरली आहे. आपण काही न करता गप्प बसून राहिलो तर तेही त्यांच्या लक्षात येते. संतापलेल्या नद्या अनेकदा माणसाला त्याची जागा दाखवतात. क्षणार्धात होत्याचे नव्हते करून टाकतात. त्यांनी केलेल्या उत्पाताची अनेक उदाहरणे दरवर्षी समोर येत असतात. माणूस फक्त ती उदाहरणे माणूस एकमेकांना सांगत बसतो. त्यातच धन्यता मानतो. नद्यांच्या परिसरात फिरले की माणूस उन्नत भावावस्थेत जातो, त्याच्यातील प्रेमळपणा, माणुसकी जागी होते. प्राचीन नद्यांच्या परिसरात तर त्याच्या हातातील दगडाचे कसे आणि किती वेगाने फूल होते; पण ते त्याच्याही लक्षात येत नाही. तो तसाच मागील पानावरून पुढील पानावर आणि एका वर्षातून दुसऱ्या वर्षाकडे निर्विकारपणे सरकत राहतो!

# माझी आणि भारुडाची ओळख अशी झाली...

महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीमध्ये अनेक गोष्टींचा समावेश होतो, ज्या हजारो वर्षांपासून चालत आलेल्या आहेत आणि आजही त्या जनसामान्यांमध्ये जागृत आहेत. त्यापैकीच एक म्हणजे भारूड. जे बहुरूड आहे ते भारूड. संत परंपरेत ज्ञानेश्वरांपासून अनेक संतांनी भारूड रचना केल्या; परंतु भारूड म्हटलं की एकनाथ महाराज डोळ्यांसमोर उभे राहतात. ३०० पेक्षा अधिक भारूडं संत एकनाथांनी लिहिली, तेही विनोदी शैलीत आणि सर्वसामान्यांचे विषय त्यामधून मांडले. यातून त्यांनी दोन उद्देश साध्य केले ते असे, करमणूक आणि दुसरा उद्देश अध्यात्मिक रसपान. सर्वसामान्यांना पटेल, रुचेल अशा साध्या सोप्या भाषेमध्ये नाथांनी भारुडे रचली त्यातून त्यांनी समाजाचे अज्ञान, अंधश्रद्धा दूर केल्या. खरं तर भारुडाविषयी असं म्हणता येईल की, लोकजीवनाच्या काळजात रुजलेले संस्कृतीचे मूळ आहे.

माझी आणि भारुडाची ओळख झाली ती अशी... आमच्या गावामध्ये कीर्तनकार बुवा येणार म्हणून गावातील लहान-थोर मंडळी कीर्तनाला उपस्थित होती. दिवे लागण्याची वेळ झाली. हळूहळू दिवे उजळू लागले. प्रत्येकाच्या हातात कंदील घेऊन जो तो चावडीसमोर येऊन जिथे जागा मिळेल तिथे विराजमान झाला. कीर्तनकार बुवांच्या साथीदाराने टाळमृदंगाचा ठेका धरला. अचानक समजले, कीर्तनकार बुवा उशिरा येणार आहेत. सज्ज व्यासपीठ वादक तयार होतेच तेवढ्यात एक जण व्यासपीठावर आला आणि त्याने सुरू केलं... विंचू चावला भारूड. अतिशय छान अभिनय, नृत्य करून सर्वांना हसवलं. त्या पाठोपाठ दादला नको गं बाई व असे एक-दोन भारूड सादर केले आणि कीर्तनकार बुवा तेवढ्यात तिथे हजर झाले. छान माहोल तयार झालेला पाहून त्यांनी भारूड सादर करणाऱ्या मुलाचा सत्कार केला आणि त्याला आशीर्वाद दिला. तेव्हापासून भारूड माझ्या मनात रुजलं आणि त्या भारुडातील खट्याळपणा मला विशेष भावला. यानंतर अनेकदा नाथांची भारूड ऐकायला मिळाली. एक दिवस शाळेतून घरी येत असताना... मंदिराच्या समोरच्या पारावर अनेक माणसे जमा झाली होती... आणि त्यातून आवाज आला...

''ऐका हो ऐका एक सांगतो गंमत!'' आणि त्या सुमधुर पहाडी आवाजाने अख्खा परिसर दुमदुमला. मी मागे वळून पाहिलं, डोक्यावर मोरपिसाची उलटी टोपी घातलेला अंगात अंग होळकर अंगरखा हातात टाळ एका बाजूला झोळी अडकवलेली अशा थाटात असलेला वासुदेव भारुडाबरोबर नृत्यही सादर करू लागला. छान गोल गिरकी घेऊन त्याने सर्वांचे लक्ष वेधले आणि पाराचा क्षणात रंगमंच झाला. आजूबाजूची लोकही जमा झाली आणि जोगवा भारूड त्याने सादर केलं त्यातून नाथांनी आदिशक्तीला विनम्रपणे घातलेलं गाऱ्हानं होतं. हसत, चिमटे काढत, त्याने जनसामान्यांच्या मनाचा ताबा घेतला. तेव्हा समजलं, भारूड म्हणजे केवळ करमणूक नव्हे. ते लोकमनाचं आरसपानी प्रतिबिंब आहे. सामान्य माणसाच्या दैनंदिन जगण्यातून जन्मलेलं, त्याच्या बोलीतून व्यक्त



झालेलं आणि त्याच्याच प्रश्नांवर बोट ठेवणारं हे लोकनाट्य, लोकगीत आणि लोककथन यांचं अनोखं मिश्रण आहे. भारूड पाहताना हसू येतं, पण हसता हसता एखादं सत्य टोचून जातं. हीच त्याची खरी ताकद.

पुढे एकनाथांच्या भारुडावर अभ्यास करताना भारूड मनाला स्पर्श करून गेलं. आणि मी या लोकसंस्कृतीच्या भारुडाच्या प्रेमात पडले. भारुडाचं स्वरूप अगदी साधं, पण प्रभावी. कोणताही भव्य रंगमंच नाही, झगमगती नेपथ्य नाही. एक-दोन कलाकार, थोडीफार वेशभूषा, टाळमृदंग आणि शब्दांचा खेळ. इतक्यावर भारूड उभं राहतं. अनेकदा भारूडकार स्वतःच निवेदक, अभिनेता आणि सूत्रधार असतो. कधी तो वेशांतर करतो, कधी प्रेक्षकांशी थेट संवाद साधतो. त्यामुळे भारूड पाहणारा केवळ प्रेक्षक राहत नाही; तो त्या खेळाचा भाग होऊन जातो.

भारुडाचं वैशिष्ट्य म्हणजे त्यातील उपरोध. थेट बोट दाखवून सांगण्याऐवजी भारूड हसत हसत सत्य सांगतं. समाजातील दांभिकपणा, अज्ञान, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार, जातिभेद, स्त्री-पुरुष विषमता हे सारे विषय भारुडात येतात, पण प्रवचनाच्या स्वरात नाहीत. एखाद्या भोळ्या पात्राच्या तोंडून, एखाद्या गंमतीदार प्रसंगातून ते उलगडत जातात. त्यामुळे ऐकणाऱ्याला न दुखावता, पण अंतर्मुख करणारी ही शैली ठरते. भारुडाचं वेगळेपण त्याच्या प्रतीकात्मकतेत आहे. अनेक भारुडांत प्राणी, पक्षी, देव, भटके, व्यापारी, फकीर अशी पात्रं येतात. ही पात्रं केवळ व्यक्ती नसतात, तर प्रवृत्तींचं प्रतीक असतात. एखादा लोभी व्यापारी म्हणजे केवळ एक व्यक्ती नसून, तो लोभाचं मूर्त रूप असतो. एखादा भोळा गोंधळी म्हणजे अज्ञानाचं प्रतीक असतो. या प्रतीकांच्या माध्यमातून भारूड व्यापक अर्थ सांगून जातं. महाराष्ट्राच्या लोकपरंपरेत भारुडाचं स्थान फार महत्त्वाचं आहे. वारकरी संप्रदायाच्या कीर्तनपरंपरेत भारुडाला विशेष मान आहे. संत एकनाथ, संत तुकाराम यांसारख्या संतांनी भारुडाचा उपयोग लोकजागृतीसाठी केला.

संत एकनाथांची भारूडं आजही लोकांच्या ओठांवर आहेत. त्यांनी भारुडातून जे अध्यात्म सांगितलं ते अध्यात्म माणसाच्या आयुष्याशी जोडलेलं होतं. त्यामुळे भारूड हे केवळ लोककलेचं रूप न राहता, समाजपरिवर्तनाचं साधन बनलं. इतिहासाच्या प्रवाहात भारुडाने अनेक रूपं धारण केली. कधी ते कीर्तनाचा भाग झाले, कधी तमाशाच्या जवळ गेले, तर कधी शाहिरी परंपरेत मिसळले. ग्रामीण जीवनातील बदल, शहराकडे झुकणारी संस्कृती, आधुनिक प्रश्न हे सारे विषय भारुडात येत गेले. तरीही त्याची मुळं लोकजीवनातच राहिली. काळ बदलला, संदर्भ बदलले, पण भारुडाची आत्मा लोकमनाशी असलेली नाळ तुटली नाही. आजच्या धावपळीच्या काळात, मोठ्या रंगमंचांवर आणि पडद्यावर चमकणाऱ्या करमणुकीच्या जगात भारूड कधी-कधी दुर्लक्षित होतं. पण जेव्हा कुठे गावच्या जत्रेत, यात्रेत किंवा सांस्कृतिक कार्यक्रमात भारूड सादर होतं.

लोक अजूनही भारुड ऐकतात, हसतात आणि विचारही करतात. कारण भारुडात माणसातील माणूसपण दडलेलं आहे. भारूड म्हणजे लोकसाहित्याच्या विशाल दालनातील एक जिवंत झरा आहे असं मला वाटतं. कारण यामध्ये आनंद देण्याची क्षमता आहे, विकारावर चिमटे घेण्याची ताकद आहे, मानवी आयुष्यातील फोलपणा आहे, करुणा व्यथा वेदना आहे, स्त्रियांचे दुःख आहे आणि अंधश्रद्धेच्या विरुद्ध केलेले परखड भाष्य आहे आणि शहाणपणही आहे. सर्वसामान्यांच्या मनावर गारुड करणारे हे भारूड जतन करून पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे. कारण यामुळेच आपली संस्कृती आपली संस्कार आपली भाषा टिकून आहे.

– लता गुठे

****

# माहूर न.पं. आर्थिक गैरव्यवहारावर उच्चस्तरीय चौकशीची शिफारस; आश्वासनानंतर आमरण उपोषण मागे

**आत्ताच एक्सप्रेस न्युज नेटवर्क**

**माहूर –** प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत लाभार्थ्यांना वितरित करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचा शासनाने विहित केलेल्या उद्देशाव्यतिरिक्त वापर केल्याचा गंभीर प्रकार माहूर नगरपंचायतीत उघडकीस आला असून, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करून सखोल तपास करावा, अशी शिफारस माहूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे केली आहे.

या शिफारशीनंतर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आनंद पाटील तुपदाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी २५ जानेवारीपासून सुरू केलेले आमरण उपोषण ३० जानेवारी रोजी मागे घेतले. प्रशासनाकडून योग्य चौकशी व कारवाईचे लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले.

म ु ख्य ा धि क ा ऱ्य ा ं नी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या अहवालात, मंजूर निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा न करता इतर बाबींसाठी वापरण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच संबंधित आर्थिक व्यवहारांची संपूर्ण लेखासंहिता, देयकांचे तपशील व आवश्यक पुरावे उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे आर्थिक शिस्तीचा तसेच योजनेच्या उद्दिष्टांचा गंभीर भंग झाल्याचा ठपका अहवालात ठेवण्यात आला आहे.

याशिवाय, स्पष्ट कागदपत्रे, देयकांची सुसंगत नोंद व व्यवहारांचे तपशील उपलब्ध नसतानाही प्रशासनाने वेळेत पोलिस विभागाकडे तक्रार दाखल न केल्याने शासकीय प्रक्रियेत हलगर्जीपणा झाल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणामुळे जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्याची नाराजी नागरिकांतून व्यक्त होत आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव यांनी यापूर्वी केलेल्या 'संघटित घुसखोरी' या वक्तव्यामुळेही या प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, या घडामोडींमुळे माहूर नगरपंचायतीतील आर्थिक व्यवहारांबाबत संशय अधिक बळावला आहे.



या गंभीर आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात नेमकी कोणती रक्कम, कोणाच्या जबाबदारीवर आणि कधी व कशा पद्धतीने वापरण्यात आली, याबाबत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी उपोषणकर्ते, लाभार्थी व सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे.

.जिल्हाधिकारी स्तरावरून होणाऱ्या कारवाईकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.



## किनवट एस.टी. आगारात वाहतूक नियंत्रक रमेश शेपूरवार यांचा सेवा पूर्ती सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस न्युज नेटवर्क**

**किनवट–** किनवट एस.टी. आगारात कार्यरत असलेले वाहतूक नियंत्रक रमेश देवन्ना शेपूरवार यांनी राज्य परिवहन महामंडळात तब्बल २८ वर्षे प्रामाणिक व निष्ठावान सेवा बजावून दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यांच्या दीर्घ सेवाकाळातील योगदानाची दखल घेत किनवट एस.टी. आगाराच्या वतीने सेवा पूर्ती सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

रमेश शेपूरवार यांनी सेवाकाळात वाहतूक नियंत्रण, वेळापत्रक व्यवस्थापन तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष दिले. कर्तव्यदक्षपणा, शिस्तप्रियता आणि सहकाऱ्यांशी सुसंवाद ही त्यांच्या कार्यशैलीची ओळख राहिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक तरुण कर्मचाऱ्यांना कामात आत्मविश्वास मिळाल्याचे सहकाऱ्यांनी सांगितले. रमेश शेपूरवार यांचा सत्कार समारंभ शनिवार, दि. ३१/०१/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता एस.टी. आगार, किनवट येथे पार पडला. या कार्यक्रमास आगारातील अधिकारी, कर्मचारी, मित्र, सहकारी व नातेवाईकांनी उपस्थित दर्शवली. सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी रमेश शेपूरवार यांना सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## सरस्वती विद्यामंदिर माध्यमिक शाळा मांडवा येथे सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न



**आत्ताच एक्सप्रेस न्युज नेटवर्क**

**किनवट –** सरस्वती विद्या मंदिर माध्यमिक शाळा मांडवा येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नरसिंग नेम्मानीवार तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती

अनुजा पाटील, नगरसेविका सौ. निकिता स्वागत आयनेनीवार, किरण नेमानीवार, पत्रकार संघाचे माझी अध्यक्ष अनिल भंडारे, पत्रकार कामराज माडपेल्लीवार यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कु. माही सत्यपाल साळवे, दिव्याशनी जायभाये, कृतिका दासरवार या विद्यार्थिनींनी आपल्या उत्कृष्ट नृत्याने प्रेक्षकांची मने जिंकली. मायभवानी आणि शिवकन्या या सारख्या स्कृतीदायक गीतांवर विश्रांती, खुशी, पंचशीला, आणि नंदिनी यांनी बहारदार सादरीकरण केले. पृथ्वीराज मुंडे व त्यांच्या संघाने गाजलेल्या गाण्यावर ठेका धरला तसेच ''राधे राधे'' या गीतावर अनुष्का राऊत व तिच्या ग्रुपने सर्वांना मंत्रमुध्द केले. इयत्ता दहावीच्या विद्यार्थीनी आलोक आणि श्रावणी कालावार तेलुगु रिमिक्स गाण्यावर सादरीकरण केले. महत्त्वाचे म्हणजे अनिल भंडारे यांनी देशभक्तीपर ''मेरी जान तिरंगा है'' हे गीत सादर केले. यावेळी प्रेषकांनी व विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गडगडाटाने शाळेचे मैदान दुमदुमून गेले होते.

## किनवटमध्ये वेल्डिंग-फॅब्रिकेशन कामगारांचे हक्क जपण्यासाठी 'मराठवाडा फॅब्रिकेशन वेल्डिंग युनियन' स्थापन

**आत्ताच एक्सप्रेस न्युज नेटवर्क**

**किनवट –** किनवट शहर व तालुक्यातील वेल्डिंग व फॅब्रिकेशन व्यवसायासमोर गेल्या काही काळापासून गंभीर अडचणी उभ्या राहिल्या आहेत. शेजारील तेलंगणा राज्यातून येणारे काही वेल्डर व फॅब्रिकेशन कामगार अत्यंत कमी दरात, तुटपुंज्या किमतीत कामे स्वीकारत असल्यामुळे स्थानिक कामगारांना योग्य मोबदला मिळेनासा झाला आहे. याचा थेट परिणाम किनवट शहरासह तालुक्यातील स्थानिक वेल्डिंग-फॅब्रिकेशन दुकानदारांवर होत असून, त्यांना कामगारांचे पगार, दुकानांचे भाडे व इतर खर्च भागवताना मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.



या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी व स्थानिक कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने शहरातील सर्व वेल्डिंग, फॅब्रिकेशन व बिल्डिंग काम करणारे व्यावसायिक एकत्र आले. त्यातून 'मराठवाडा फॅब्रिकेशन वेल्डिंग युनियन, किनवट' या संघटनेची स्थापना करण्यात आली. संघटनेच्या माध्यमातून कामाचे दर ठरवणे, बाहेरून येणाऱ्या कमी दराच्या कामांवर आळा घालणे, स्थानिक कामगारांना योग्य मोबदला मिळवून देणे तसेच व्यवसायिकांच्या अडचणी सामूहिकरित्या मांडणे, हा या युनियनचा प्रमुख उद्देश आहे.

युनियनच्या नव्या कार्यकारिणीचा सन्मान सोहळा अध्यक्ष बाबा भाई यांच्या कार्यालयाजवळ पार पडला. या कार्यक्रमात माननीय आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते सर्व पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष कृष्णा सोळंके, कोषाध्यक्ष अश्विन पवार, सचिव सलीम भाई, सहकोशाध्यक्ष अजहर भाई, सहसचिव धम्मा वाघमारे सह शहरातील व तालुक्यातील अनेक वेल्डिंग-फॅब्रिकेशन कामगार, व्यावसायिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी युनियनमध्ये सक्रिय सहभाग असलेल्या व उपस्थित मान्यवरांमध्ये कलीम भाई, सलीम भाई, सना भाई, फिरोज भाई, अगबाल भाई, अतुल भाई, मनोज भाई, अहमद भाई, कुंदन भाई, इमरान भाई, सुशील भाई, राजू भाई, गाजू सोंटखें, मेहमूद भाई, मकसूद भाई, अमोल पवार, अविनाश पवार, शाहरुक भाई बाबू भाई व रशीद भाई यांचा समावेश होता.

युनियनच्या स्थापनेमुळे किनवटमधील वेल्डिंग-फॅब्रिकेशन क्षेत्रात शिस्त, एकजूट व दरांबाबत समानता येईल, तसेच स्थानिक कामगारांना न्याय्य मोबदला मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या संघटनेच्या माध्यमातून भविष्यात प्रशासनाकडेही विविध मागण्या मांडून व्यवसायिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## किनवट मधील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी नगराध्यक्षाच्या सूचना

**आत्ताच एक्सप्रेस न्युज नेटवर्क**

**किनवट –** किनवट शहरात गाढव, खेचर, मोकाट जनावराच्या उच्छादाने वाढलेल्या अपघातांना प्रतिबंध लावण्यासाठी नागरिकांच्या तक्रारीची गंभीर दखल नगराध्यक्षा सुजाता एंड्रलवार, मुख्याधीकारी मुंगाजी काकडे व नगरसेवकांनी घेउन पशुपालकांची बैठक पोलीस प्रशासनाला समवेत घेउन अपघातास कारणीभूत ठरलेल्या पशु मालकावर कठोर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

किनवट नगरपरिषद कार्यक्षेत्रातील मोकाट जनावरानां आळा घालण्याकरीता अश्ववर्गीय प्राणी (गाढव/खेचर) यांच्या पशुपालक समवेत दि.२९/०१/२०२६ रोजी मा.मुख्याधिकारी यांच्या दालनात पोलीस व नगरपरिषद



प्रशासन यांच्या संयुक्तीक बैठक प्रस्तावीत करण्यात आली होती. सदर बैठकीस चांगला प्रतिसाद पशुपालकांनी दिला व या कामी सर्वतोपरि सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सदर बैठकीस मा.मुख्याधिकारी श्री.मुगाजी काकडे, पोलीस प्रशासन प्रतिनिधी म्हणुन पोलीस उप-निरीक्षक श्री झाडे, कार्यालयीन अधिक्षक श्री.अशोक भालेराव उपस्थित होते.

मोकाट जनावरापासुन होणाऱ्या अपघाताच्या अनुषंगीक शक्यतावर प्रथम चर्चा करण्यात आली व मोकाट जनावरांना आळा घालण्याकरीता नगरपरिषदेकडे प्राप्त तक्रारी च्या अनुषंगाने पशुपालकानां मोकाट जनावरे इतरत्र रस्त्यावर फिरु न देता निश्चीत ठिकाणी कामानंतर बांधुण ठेवण्यात यावी व बांधुण ठेवण्यात आलेल्या जागे संदर्भात माहिती प्रशासनास कळविण्यात यावी असे निर्देश देण्यात आले. कोणतेही मोकाट जनावरे रस्त्यावर फिरतानां निदर्शनास आल्यास महाराष्ट्र नगरपरिषद व नगरपंचायत अधिनियम १९६५ अन्वये कार्यवाही प्रस्तावीत करण्याच्या सूचना निर्गमीत करण्यात आल्या.

किनवट नगरपरिषद कार्यक्षेत्रातील संबंधीत पशुपालकानां दि. ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मोकाट जनावरांना रस्त्यावर येऊ न देण्याबाबत उपाययोजना करण्याबाबत अवधी देण्यात आला. बैठकीस पशुपालकाकडुन सूचना मांडल्या व त्याची सकारात्मकरित्या नोंद घेण्यात आली. बैठक शांततेत व यशस्वीरित्या संपन्न झाली असुन किनवट नगरपरिषद कार्यक्षेत्रातील मोकाट जनावराच्या ज्वलंत प्रश्नाकरीता पशुपालक नगरपालिका प्रशासन सर्वांनी एकत्रीतरित्या कामे करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. नगरपरिषेदे घेतलेल्या जनहीताच्या निर्णयाचे शहरवासीयांनी स्वागत केले.

## माहूरात २४ फेब्रुवारी रोजी आ.केरामांचा जनता दरबार; प्रशासनातील अनेक प्रकरणे उघडकीस येण्याची शक्यता

**आत्ताच एक्सप्रेस न्युज नेटवर्क**



**माहूर –** शासनाच्या विविध लोकहितकारी योजना खरोखरच गरजू नागरिकांपर्यंत पोहोचत आहेत का, प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी जबाबदारीने काम करीत आहेत का, नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निरसन होते की नाही, याचा थेट आढावा घेण्यासाठी माहूर येथे २४ फेब्रुवारी रोजी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. या जनता दरबाराला आमदार भीमराव केराम यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, यामुळे प्रशासनावर निश्चितच दबाव निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या जनता दरबारामध्ये तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना महसूल, पंचायत समिती, नगरपंचायत, वीज वितरण कंपनी, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, समाजकल्याण आदी विविध विभागांशी संबंधित तक्रारी, समस्या व प्रलंबित प्रश्न थेट मांडण्याची संधी मिळणार आहे. अनेक दिवसांपासून रखडलेल्या फाईली, दिरंगाई, हलगर्जीपणा तसेच कथित भ्रष्टाचारासंबंधी तक्रारींवर यावेळी थेट चर्चा होऊन संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला जाण्याची शक्यता आहे.

नागरिकांनी आपल्या तक्रारी लेखी स्वरूपात सादर कराव्यात, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या तक्रारी १५ फेब्रुवारीपर्यंत माहूर तालुका भाजप कार्यालयात स्वीकारल्या जाणार असून, प्राप्त तक्रारींची छाननी करून त्या जनता दरबारात मांडल्या जाणार आहेत. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर यावेळी ठोस निर्णय होईल, अशी अपेक्षा नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. आमदार भीमराव केराम यांच्या उपस्थितीमुळे हा जनता दरबार केवळ औपचारिक न राहता परिणामकारक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. सामान्य नागरिकांना न्याय मिळतो की नाही, प्रशासनातील दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई होते की नाही, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# नांदेडमध्ये महाराष्ट्रातील रील स्टार्सचा भव्य गेट टुगेदर इव्हेंट

**आत्ताच एक्सप्रेस न्युज नेटवर्क**

**नांदेड –** अभनेते व दिग्दर्शक असलेले आणि २००७ पासून चित्रपट सृष्टीत कार्यरत असलेले लक्ष्मीकांत मुंडे व अनेक चित्रपटातून विविध भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री वंदना गव्हाणे यांनी लातूर येथील रीलस्टार्स चा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडल्यानंतर आता नांदेडमध्ये खास कलाकारांच्या आग्रहास्तव व सोशल मीडियावर आपल्या अभिनय, विनोद आणि सर्जनशीलतेने लाखो चाहत्यांच्या मनात स्थान निर्माण करणाऱ्या रील स्टार्ससाठी नांदेड शहरात एक भव्य गेट टुगेदर आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सोमवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत नागोराव नरवाडे मंगल कार्यालय, पूर्णा रोड, वामन नगर, नांदेड येथे पार पडणार आहे.

या कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रातील नामांकित रील स्टार्स, कलाकार, दिग्दर्शक, निर्माता, मेकअप आर्टिस्ट तसेच सोशल मीडिया कंटेंट क्रिएटर्स सहभागी होणार असून, रील्स, मनोरंजन आणि नेटवर्किंगचा एक अनोखा संगम अनुभवता येणार आहे.

कार्यक्रमास बसपा महाराष्ट्र प्रदेश प्रभारी व निर्माता आदरणीय मनीष भाऊ कावळे, अभिनेता-दिग्दर्शक-निर्माता आदरणीय अनिकेत आळंदिकर सर, नांदेड इव्हेंटचे प्रमुख पाहुणे फेमस रील स्टार गजानन पाटील, तसेच अभिनेता-दिग्दर्शक-निर्माता आदरणीय आनंद शिंदे बाबा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

याशिवाय संघटन मंत्री सखाराम इंगोले, कॅमेरा मॅन रवी शेलार, अभिनेता शुभम पौनिकर, लेखक दयानंद लोने, उमरी (जि. नांदेड) येथील नगरसेवक कैलास गोठेकर, फ ेमस रील स्टार वर्षा जाधव, ललिता सातपुते, हास्य कलाकार सचिन पंडित, मेकअप आर्टिस्ट अनुराधा गिरी, अभिनेत्री शिल्पा पवार आदी मान्यवर व कलाकार उपस्थित राहणार आहेत.

या भव्य उपक्रमाचे आयोजन अभिनेता-दिग्दर्शक लक्ष्मीकांत मुंडे व अभिनेत्री वंदना गव्हाणे यांनी केले असून, कार्यक्रमाचे नियोजन मानसी गव्हाणे व बसपा नांदेड जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकला देवानंद ढगे यांनी केले आहे. तर निमंत्रक म्हणून रील स्टार विजय शेप व रील स्टार सांभाजी खेंरे कार्यरत आहेत.

रील स्टार्ससाठी हा कार्यक्रम नवी ओळख, सहकार्याच्या संधी आणि मनोरंजनाचा अनोखा अनुभव देणारा ठरणार असून, प्रवेश शुल्क फक्त ₹२०१ इतके ठेवण्यात आले आहे. मर्यादित प्रवेश असल्याने इच्छुकांनी लवकर नोंदणी करण्याचे आवाहन




आयोजकांनी केले आहे.

नोंदणी व अधिक माहितीसाठी ९०२२८२२२८९ किंवा ७६६६३ १६५२६ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# फोटोसेशनवर समाधान,आरोपी मात्र मोकाट; वनविभागाच्या कारवायांवर आणि अधिकाऱ्यांवर प्रश्नचिन्ह

**आत्ताच एक्सप्रेस न्युज नेटवर्क**

**किनवट–** गोकुंदा येथे अवैध सागी लाकडाचे फर्निचर बनवत असताना वनविभागाने छापा टाकला. मुद्देमाल जप्त झाला, आकडेवारी जाहीर झाली, फोटोसेशन झाले पण नेहमीप्रमाणे आरोपी फरार झाला. आणि इथेच खरा प्रश्न उभा राहतोवरिष्ठ अधिकारी एवढ्यावरच समाधान मानणार आहेत का?



किनवटमाहूर तालुक्यातील जंगल संपत्तीवर दिवसाढवळ्या डल्ला मारला जात असताना, वनविभागाच्या प्रत्येक कारवाईचा शेवट एकसारखाच का होतो? गुप्त माहिती मिळते, छापा टाकला जातो, लाकूड जप्त होते आणि नेमक्या त्याच क्षणी आरोपी पळून जातो. ही केवळ योगायोगाची बाब आहे की जाणूनबुजून सुरू असलेला निष्काळजीपणा, हा सवाल आता जनतेतून विचारला जात आहे.

वरिष्ठ अधिकारी दरवेळी जप्त मुद्देमालावर समाधान मानून मोकळे होतात. पण आरोपी फरार कसा झाला, कुठल्या कर्मचाऱ्यांची चूक झाली, कोणत्या टप्प्यावर माहिती बाहेर गेलीयाचा जाब कुणी विचारतो का? की कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे धाडसच कुणी करत नाही?

खरे तर वनसंपत्ती वाचवायची असेल तर केवळ लाकूड जप्त करून उपयोग नाही. तस्करीची साखळी तोडणे, सूत्रधार ओळखणे आणि त्यांना गजाआड करणे, हे वरिष्ठांचेही कर्तव्य आहे. मात्र प्रत्यक्षात मात्र 'आरोपी फरार' हा शब्द कारवाईचा अविभाज्य भाग बनला आहे. प्रश्न साधे, पण उत्तर नाहीत फरार आरोपी पकडण्यासाठी विशेष पथक का नेमले जात नाही? वारंवार अपयशी ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी होणार की नाही? की प्रत्येक वेळी वरिष्ठ केवळ जप्तीचा अहवाल पाहून डोळेझाक करणार? जर यापुढेही फरार आरोपींच्या बाबतीत अशीच उदासीनता राहिली, तर वनविभागाच्या कारवायांवरचा जनतेचा विश्वास उडेल.

# तिनफाटा वन्यजीव प्रकरण : घटना स्थळ मिळाले, तरी कारवाई शून्य; वनविभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह

**आत्ताच एक्सप्रेस न्युज नेटवर्क**

**किनवट -** तिनफाटा परिसरात घडलेल्या वन्यजीव शिकार प्रकरणात काही प्राथमिक पुरावे समोर येऊनही अजूनपर्यंत कुणावरही ठोस कारवाई झालेली नाही. व्हायरल झालेला व्हिडीओ, झाडाझडती घेतलेली ठिकाणं आणि घटनास्थळाचं लोकेशन एकमेकांशी जुळत असतानाही आरोपी मोकाट कसे, असा सवाल उपस्थित होत आहे.

ज्या शेतात ही घटना घडल्याचं बोललं जातं आहे, त्या शेताचा सर्वे नंबर आणि शेतमालकाची माहिती तपासासाठी महत्त्वाची असताना ती अजूनही बाहेर आलेली नाही. एवढी सोपी माहिती काढायला विलंब का होतोय, की मुद्दाम टाळाटाळ केली जातेय, अशा चर्चा आता रंगू लागल्या आहेत. महत्वाचं म्हणजे या सगळ्या प्रकरणात ज्या वनपालाच्या अखत्यारीत हा भाग येतो, त्याला चौकशीसाठी बोलावलं गेलं का, याबाबत कुठलीही अधिकृत माहिती नाही. आणि जर जबाबदारी ठरवायची असेल तर निलंबनाची कारवाई का झाली नाही, हाही प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, मृत वन्यप्राण्यांचे मृतदेह जाळून विल्हेवाट लावल्याची बाब समोर आली, त्यांची चौकशी नेमकी कुठवर पोहोचली, याबाबतही संभ्रम आहे. संशयिताची चौकशी झाली असेल, तर अटक का झाली नाही? असा थेट सवाल उपस्थित होत आहे.



शेतीभोवती लावलेल्या काटेरी तारांच्या कुंपणात वीज सोडल्यामुळे वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला? का त्याची शिकार झाली? हा संशय आधीच व्यक्त करण्यात आला असतानाही कारवाई पुढे सरकत नाही, यामुळे वनविभागाच्या कामकाजावर लोकांचा विश्वास ढासळताना दिसत आहे.

# कंत्राटी विद्युत कामगाराच्या न्याय-हक्कासाठी मनसे मैदानात

## नांदेडच्या मुख्य अभियंता कार्यालयासमोर आज ढोल बजाओ आंदोलन

**आत्ताच एक्सप्रेस न्युज नेटवर्क**



**किनवट –** कार्यक्षम विद्युत कामगारांना कमी करून नव्या कंत्राटी कामगारांची बेकायदेशीर भरती केल्याप्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली असून जुन्या कंत्राटी कामगारांना तात्काळ कामावर घ्यावे शासन आदेशाप्रमाणे विद्युत कामगारांना त्यांच्या बँक खात्यात थेट वेतन आदर करण्यात यावे उपकार्यकारी अभियंता केंद्रे यांच्या कारभाराची चौकशी करावी कामावर नसलेल्या कामगारांना पोर्टलमध्ये ऑनलाईन हजेरी भरून दोन महिन्याचे वेतन परस्पर काढून लाखो रुपयांचा आर्थिक केल्याप्रकरणी कंत्राटदार व अधिकाऱ्यांची चौकशी करून निलंबनाची कारवाई करावी, दोषी कंत्राटदाराला काळ्या यादी टाकावे तसेच कामगारांचे मागील तीन महिन्याचे थकीत वेतन त्वरित अदा करावे या मागण्यासाठी २ फ ेब्रुवारी २०२६ रोजी नांदेड येथील मुख्य अभियंता कार्यालयासमोर जिल्हाध्यक्ष मॉंटीसिंग जाहगीरदार यांच्या नेतृत्वाखाली ढोल बजाव आंदोलन करण्याचा इशारा मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन मोहरे यांनी विद्युत कार्यालयाला दिला आहे.

निवेदनात नमूद केले आहे की किनवट उपविभाग अंतर्गत कार्यरत जुन्या विद्युत कंत्राटी कामगारांना संबंधित कंत्राटदार व विद्युत कार्यालयाचे अधिकारी यांनी संगणमत करून कामावरून कमी केले या संदर्भात मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन मोहरे यांनी कामगारावर होणाऱ्या अन्यायाविरोधात विद्युत कार्यालयाकडे रीतसर तक्रार दाखल करून कंत्राटी कामगारांची आर्थिक व मानसिक पिळवणूक करणाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी २८ नोव्हेंबर २०२५ रोजी केली होती दरम्यान तक्रारीच्या अनुषंगाने नांदेड येथील महावितरण कार्यालयाने तक्रारीत नमूद मुद्द्याच्या अनुषंगाने पुराव्यास खुलासा सादर करावा असे पत्र दिले. त्यानुसार पुरावे सादर केले तरी देखील कार्यवाही झाली नाही. उलट कंत्राटदाराकडून जुन्या कंत्राटी कामगारांना सातत्याने दमदाटी करण्यात येत असल्याचा आरोप नितीन मोहरे यांनी केला. विद्युत कार्यालयातील अधिकारी हे कामगाराऐवजी कंत्राटदाराला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करत असुन यासंदर्भात वरिष्ठाकडे वारंवार निवेदने तक्रारी, विनंती अर्ज करून देखील न्याय मिळत नसल्याने मनसेने आंदोलनाचे अस्त्र उगारले आहे.जुन्या कंत्राटी कामगारांना तात्काळ कामावर घ्यावे, शासन आदेशाप्रमाणे विद्युत कामगारांचे पूर्ण वेतन त्यांच्या बँक खात्यात टाकावे,उपकार्यकारी अभियंता केंद्रे यांच्या गैर कारभाराची चौकशी करावी, कामावर नसलेल्या कामगारांना पोर्टलमध्ये ऑनलाईन हजेरी भरून दोन महिन्याचे वेतन परस्पर काढून आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी कंत्राटदारासह अधिकाऱ्यांची चौकशी करून निलंबित करावे दोषी कंत्राटदार कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे तसेच कामगारांचे मागील तीन महिन्याचे थकीत वेतन त्वरित अदा करावे अशा मनसेच्या मागण्या असुन या मागण्यासाठी २ फेब्रुवारी रोजी नांदेड येथील मुख्य अभियंता कार्यालयासमोर जिल्हाध्यक्ष मॉन्टीसिंग जहागीरदार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने ढोल बजाव आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधण्यात येणार असल्याचे मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन मोहरे यांनी निवेदनात म्हटले आहे.

पान १ वरून

## केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२०२७ सादर;..

आहे. दुसरे कलम– वस्त्रोद्योग आणि रोजगार विस्तार योजनेद्वारे पारंपारिक वस्त्रोद्योगाला आर्थिक हातभार देऊन त्याचे आधुनिकीकरण केले जाणार आहे. तिसरे कलम राष्ट्रीय हातमाग आणि हस्तकला कार्यक्रमाद्वारे हातमाग आणि हस्तकलेला बळ देऊन महिला कामगारांचे सबलीकरण केले जाणार आहे.

कलम चार पर्यावरण पूरक वस्त्रोद्योगाला बळ दिले जाणार आहे. पर्यावरणाची हानी न होता कापड निर्मिती उद्योगाचा विकास केला जाणार आहे. पाचवे कलम महात्मा गांधी ग्राम स्वराज्य खादी आणि हातमाग सशक्तीकर योजनेद्वारे खादी, हस्तकला आणि हातमाग उद्योगाला चालना दिली जाणार आहे. या योजनेद्वारे प्रामुख्याने उपयोजित प्रशिक्षण, कौशल्यांचा विकास आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण आदींद्वारे जागतिक बाजारात मूल्यसाखळीचा विकास करणे. देशी उत्पादनांचे जागतिक पातळीवर ब्रँडिंग केले जाणार आहे.

२०२६–२७च्या अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी देशाच्या आरोग्यसेवा क्षेत्राबाबत एक महत्त्वाची घोषणा केली. बायोफार्मा शक्ती योजनेअंतर्गत, त्यांनी सांगितले की मधुमेह, कर्करोग आणि स्वयंप्रतिकार रोगांसारख्या वेगाने वाढणाऱ्या आजारांवर संशोधन, नवीन औषधे आणि आधुनिक उपचारांना प्रोत्साहन दिले जाईल. या उपक्रमासाठी तीन राष्ट्रीय संस्था स्थापन केल्या जातील आणि सरकारने १०,००० कोटी रुपयांचे बजेट वाटप केले आहे. यामुळे गंभीर आजारांशी लढण्याची क्षमता बळकट होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केलाय.

देशाच्या २०२६–२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात, सरकारने बायोफार्मास्युटिकल क्षेत्रासाठी एक नवीन दिशा जाहीर केली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी या क्षेत्राच्या विकासासाठी १०,००० कोटी रुपये खर्च करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या उपक्रमांतर्गत, तीन नवीन उच्च शिक्षण संस्था स्थापन केल्या जातील. जिथे संशोधन, औषध विकास आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान चालवले जाईल. बायोफार्म शक्ती योजनेद्वारे, सरकार बायोटेक आणि औषधनिर्माण क्षेत्रात भारताला बळकट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सोबतच १ एप्रिलपासून नवा आयकर कायदा लागू होणार आहे. तर अपघात विमा देखील करमुक्त करण्यात आला आहे.

भारतात आजारांचे स्वरूप काळानुसार वेगाने बदलत आहे. जीवनशैलीशी संबंधित समस्या वाढत आहेत. आज, देशात मधुमेहाच्या रुग्णांची संख्या इतकी वाढली आहे की भारताला जगातील मधुमेहाची राजधानी म्हटले जात आहे. परवडणारे आणि चांगले उपचार आवश्यक आहेत. कर्करोगाचा उपचार सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर आहे, परंतु स्वदेशी औषधे आराम देऊ शकतात. शिवाय, ऑटोइम्यून आजार देखील वेगाने वाढत आहेत.

मधुमेह आणि कर्करोगावरील औषधे स्वस्त होतील. जैविक औषधांच्या विकासावर भर दिला जाईल. सेमीकंडक्टरसाठी ₹४०,००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे, तर बायोफार्मास्युटिकल्ससाठी ₹१०,००० कोटींची तरतूद पाच वर्षांत करण्यात आली आहे. महात्मा गांधी स्वराज योजना जाहीर करण्यात आली आहे. शिवाय, कॉर्पोरेट–अनुकूल संस्थांसाठी व्यावसायिक संस्था स्वस्त होतील.

निर्मला सीतारमण यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात कंटेनर उत्पादनासाठी ₹१०,००० कोटींची तरतूद करण्यात आल्याची घोषणा केली. शिवाय, २२ नवीन जलमार्ग आणि तीन समर्पित कॉरिडॉर बांधण्याचीही घोषणा करण्यात आली आहे. पाच प्रादेशिक वैद्यकीय केंद्रे स्थापन केली जातील. वृद्धांसाठी एक मजबूत आरोग्यसेवा परिसंस्था तयार केली जाईल. खगोलशास्त्राला प्रोत्साहन दिले जाईल. च्या मदतीने पर्यटक मार्गदर्शकांना प्रशिक्षण दिले जाईल. क्रीडा आणि खेळाडूंच्या विकासासाठी काम केले जाईल.

देशातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करण्यासाठी. अल्पभूधारक शेतकऱ्यांची शेती अधिक फायदेशीर करण्यासाठी. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रशिक्षित मनुष्य आणि उच्च–गुणवत्तेच्या तंत्रज्ञानावर भर दिला जाईल. त्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातील शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरेल, असे बहुभाषिक भारत विस्तार एआय टूल सुरू करण्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी (ता. १) लोकसभेत अर्थसंकल्प सादर केला.

देशाच्या कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमतेचे वारे वाहू लागले आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला कृत्रिम बुद्धिमतेची जोड मिळणार आहे. त्यासाठी केंद्र सरकार भारत विस्तार एआय टूलची म्हणजे 'व्हर्च्युल इंटीग्रेटेड सिस्टम टू एक्सेस ॲग्रीकल्चर रिसोर्स' या बहुभाषिक एआय टूल विकसित केले जाणार आहे. हे टूल देशातील प्रमुख भाषांमध्ये उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यामुळे अडचणीच्या, नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना निर्णय घेण्यासाठी मदत होणार आहे. एआय टूलमुळे नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांच्या नुकसानीची जोखीम कमी होईल, असेही अर्थमंत्री म्हणाल्या.

पीक वैविध्यता वाढावी, शेतीच्या उत्पादकतेत वाढ व्हावी, शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी आणि कृषी आणि संलग्न क्षेत्रात रोजगार निर्मिती व्हावी. या दृष्टीने किनारपट्टीवरील शेतकऱ्यांच्या अर्थकारणाला बळकटी देण्यासाठी नारळ, काजू, चंदन उत्पादकांसाठी विविध योजनांची घोषणाही अर्थमंत्र्यांनी केली. त्यानुसार देशातील एक कोटी नारळ उत्पादक शेतकऱ्यांची उत्पादकता वाढवण्याचे केंद्र सरकार लक्ष्य आहे. २०३० पर्यंत जागतिक स्तरावर काजू आणि भारतीय नारळाला प्रीमियम ग्लोबल ब्रॅड करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली जाणार आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांच्या मदतीने भारतीय चंदन परिसंस्थेला गती दिली जाणार आहे.

मत्स्य व्यवसायला चालना दिली जाणार आहे. त्यासाठी ५०० जलाशय आणि अमृत तलावांचा समन्वयीत विकास केला जाणार आहे. मत्स्य व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी मत्स्य उत्पादनात वाढ करणे. मत्स्य बाजारपेठ विकसित करणे आणि मत्स्य व्यवसाय वृद्धीसाठी स्टार्टअप्स, महिला बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांची मदत घेतली जाणार आहे, असेही सीतारामण म्हणाल्या.

पशुपालन व्यवसायासाठी अनुदानित कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. पशुपालन व्यवसायात चांगले प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी मजुरांना प्रशिक्षण दिले जाईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. पशुपालन आणि कुक्टपालनला प्रोत्साहन देण्यासाठी मूल्यसाखळीचा विकास केला जाईल. जेणेकरून पशुपालन आणि कुक्कुटपालन उत्पादनांना चांगला दर आणि बाजारपेठ उपलब्ध होईल, असेही अर्थमंत्री म्हणाल्या.






हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी–४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०–२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laxími offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813